ठाणे, बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४८ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे




अग्रलेख

**वाढत्या प्रदूषणाचे घातक परिणाम**

वाढते प्रदूषण, घरोघरी अगरबत्ती, सुगंधित अगरबत्ती, मच्छर अगरबत्ती, कापूर, धूप यांच्या ज्वलनाने घरातील प्रदूषण आदींचा वाढता वापर, पचनाशी संबंधित समस्या आणि कार्यालयीन स्थळी.......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३१° से | २६° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७४,४५० | ९१,000 |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



इथून ५ खड्डे पुढे जा, डावीकडे वळून १३ खड्डे आणि उजवीकडे वळल्यानंतर ७ वा खड्डा येईल. पुन्हा डावीकडे जा, फुले मंडई येईल.

# परतीच्या पावसाचा जोर वाढणार !

## राज्यात पुढील ३ ते ४ दिवस पावसाची शक्यता

पुणे: राज्यात पुढील ३ ते ४ दिवस पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाडा, विदर्भासह अन्य काही ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. त्याचबरोबर मध्य महाराष्ट्र, कोकण या ठिकाणी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता (Maharashtra Weather Update) वर्तवण्यात आली आहे. राज्यातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, तर काही जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट दिला आहे. मान्सूनने पश्चिम राजस्थानपासून परतीचा प्रवास सुरू केला आहे. तो आता गुजरातमधील कच्छपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे आता बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा २४ तासांत तयार होणार आहे. याच्या परिणामामुळे राज्यातील पाऊस वाढणार असून, विदर्भ, मराठवाडा, कोकण, मध्य महाराष्ट्र या भागात मुसळधार पाऊस पुढील तीन ते चार दिवस पडणार आहे. मध्य महाराष्ट्र, कोकणात देखील पाऊस पुढील तीन दिवस हजेरी लावणार आहे.

**या जिल्ह्यांना अलर्ट जारी**

**यलो अलर्ट :** पालघर, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सांगली, सोलापूर, संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ.

**ऑरेंज अलर्ट :** रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड.



**पावसाने झोडपले –** अहमदनगर शहरासह जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपले होते. अहमदनगर शहराच्या बाजूने वाहत असलेल्या सीना नदीला पूर आला आहे. सीना नदीला आलेल्या पाण्याने नगर – कल्याण महामार्ग वरील पूल पाण्याखाली गेला आहे. नगर – कल्याण महामार्ग वाहतुकीसाठी बंद, पर्यायी मार्गाने वाहतूक वळवली आहे. हवामान खात्याने तीन दिवस नगर जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज दिला आहे.

### आगामी तीन दिवस पुण्यात मुसळधार पाऊस

पुणे शहर, परिसरासह पिंपरी चिंचवड या ठिकाणी पुढील दोन ते तीन दिवस मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने पुणे जिल्ह्याला रेड अलर्ट जारी केला आहे. वादळी वाऱ्यासह घाटमाथ्यावर पावसाचा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, सोमवारी सायकांळी विजांचा कडकडाटासह, वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. शहरात गेल्या काही दिवसांपासून कडक ऊन जाणवत आहे, उकाडाही वाढला होता.

**हवामान खात्याचा अंदाज –** हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात एक आणि म्यानमारच्या दक्षिण किनारपट्टीवर हवेची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून आज पासून बंगालच्या उपसागरात हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन, ते महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करण्याची शक्यता आहे. (पान २ वर)

# सिनेटमध्ये कोण बसणार ?

## मतदान संपन्न : युवासेना -अभाविपमध्ये थेट लढत

मुंबई : मुंबई विद्यापीठाच्या बहुचर्चित अधिसभा (सिनेट) निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झाले असून उद्धवसेनेची युवासेना आणि भाजपप्रणीत अभाविप या दोन संघटनांचे उमेदवार आमने–सामने आहेत. एकूण २८ उमेदवार ही निवडणूक लढवीत असून युवासेना आणि अभाविपच्या प्रत्येकी १० उमेदवारांत हा सामना रंगेल, अशी चर्चा आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी सिनेटमध्ये (पान २ वर)

**अखेर आज मतदान संपन्न झाले....** गेले अनेक वर्षांपासून मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणूक चर्चेत राहिली आहे. सिनेट निवडणूक २०२२ मध्ये होणे अपेक्षित होते. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी सिनेट बैठकीत नसल्याने प्रशासनावर कोणाचाही वचक उरलेला नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार सिनेट निवडणुकीसाठी नव्याने मतदारांची नोदणी करण्यात आली. त्यानुसार राज्य सरकारने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(न) नुसार सिनेटवर १० नोंदणीकृत पदवीधरांच्या जागांकरिता २२ सप्टेंबर रोजी मतदान घेण्याचे जाहीर केले होते त्यानुसार काल मंगळवारी १० जागांवरील निवडणुकीसाठी एकूण २८ उमेदवार रिंगणात उतरले होते, तर या निवडणुकीत एकूण १३,४०६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

**जुळवाजुळव** – सिनेटची निवडणूक पसंतीक्रमाच्या मतांनुसार होते. त्यामुळे सध्या झालेली नोंदणी लक्षात घेता युवासेना वगळता इतर सर्वच उमेदवारांचे दुसऱ्या पसंतीक्रमाच्या मतांसाठी संघटनांकडून काय व कशी राजकीय जुळवाजुळव केली जाते याकडे लक्ष असेल.

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवरील नोंदणीकृत पदवीधर गटाच्या खुल्या प्रवर्गातील ५ जागांसाठी १५, तर प्रत्येकी १ जागा असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातून २, अनुसूचित जमाती प्रवर्गातून ३, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गातून ३, इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी ३, महिला प्रवर्गातून २ असे एकूण २८ उमेदवार १० जागांसाठी निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर एकूण १३ हजार ४०६ नोंदणीकृत पदवीधर मतदार आहेत. मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील एकूण ३८ मतदान केंद्रांवर आणि ६४ बुथवर ही निवडणूक पार पडत आहे.

**वंचितचा पाठिंबा –** बहुजन विकास आघाडीने ४, तर छात्रभारतीने एक उमेदवार उतरवला आहे. त्यांची या निवडणुकीत युती असून प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीनेही छात्रभारतीला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे ही निवडणूक अटीतटीची होण्याची शक्यता आहे.

### ठाकरे गटाची युवा सेना आणि अभाविपमध्ये थेट लढत, अपक्षांची मतेही निर्णायक

युवासेना (ठाकरे गट) आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यापीठ विकास मंचाद्वारे सर्व १० जागांसाठी उमेदवार उभे करण्यात आले आहेत. तर बहुजन विकास आघाडीचे (वसई) ४, छात्रभारती विद्यार्थी संघटनेचा १ आणि ३ जण अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर शिंदे गटाची युवा सेना (पान २ वर)







■ मुंबई विद्यापीठाच्या सिनेट सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी मंगळवारी सर्वत्र मतदान झाले.उबाठा युवासेना आणि अभाविप असा सामना रंगलेल्या या निवडणुकीच्या मतदानासाठी ठाणा कॉलेजच्या समोर बुथ लावण्यात आले होते. (छाया – मनोज सिंह)

# ‘क्लस्टर’च्या माध्यमातून होणार दौलत नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीचा विकास

## रहिवाशांना मिळणार सर्व सुखसोयींनी युक्त प्रशस्त घरे





ठाणे – ठाणे पूर्व कोपरी येथील दौलत नगर को. ऑप. हौसिंग सोसायटीचा विकास ‘क्लस्टर’च्या माध्यमातून करण्याचा एकमुखी ठराव सोसायटीच्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर झाला आहे. ‘क्लस्टर’ विकासामुळे सभासदांना प्रशस्त घर, उद्यान, जॉगिंग ट्रक, अंतर्गत रस्ते, पार्किंग, स्विमिंग पूल इत्यादी सुविधा उपलब्ध होणार आहे. मात्र काही विघ्नसंतोषी मुठभर सभासदांनी स्वार्थासाठी कांगावा करत विकासाविरोधात भूमिका घेतली आहे. या अपप्रचाराला उर्वरित २०० सदस्य बळी पडले नाहीत आणि पडणार नाहीत, असे स्पष्टीकरण आज एका पत्रकार परिषदेत कार्यकारी मंडळाने दिले.

पत्रकार परिषदेला सोसायटीचे अध्यक्ष अनिल गुलाटी, सचिव महेश करणा, खजिनदार रमेश जेवानी, कार्यकारी मंडळ सदस्य आणि सभासद उपस्थित होते.

- मुठभर विघ्नसंतोषी सभासदांचा विकासात खोडा घालण्याचा अयशस्वी प्रयत्न
- दौलत नगर को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या कार्यकारी मंडळाने खोडले सर्व आरोप

दौलत नगर को–ऑप. हौसिंग सोसायटी ही सुमारे ६० वर्ष जुनी आहे. सोसायटीला २००२ पासून उ १ अतिधोकादायक इमारत म्हणून अनेक नोटीसा मिळाल्या आहेत. सध्या सर्व (पान २ वर)

# बीडमधील आयटीआय संस्थेला दिवंगत नेते विनायक मेटे यांचं नाव



**जय शिवसंग्रामच्या महाराष्ट्र संपर्क प्रमुख आकाश जाधव यानी मानले महायुती सरकारचे आभार**

ठाणे – दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय राहून सातत्याने लोकांच्या हिताची कामे केली. मराठा आरक्षण लढा व विद्यार्थ्यांसाठी आंदोलन उभे करून न्याय देण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या जाण्याने राज्यातील राजकारणात पोकळी निर्माण झाली. परंतु त्यांचे समाजकार्य त्यांचे योगदानाची दखल दखल घेतली. बीड आयटी आयच्या लोकनेते विनाकाराव मेटे यांचे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. याबद्दल महायुती सरकारचे जय शिवसंग्रामचे महाराष्ट्र संपर्क प्रमुख आकाश जाधव यांनी आभार मानले आहे. सोमवारी (दि. २३) राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. या बैठकीत काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय यांचे नामांतर करण्याचा निर्णयही झाला.

शासनाने १४ आयटीआय यांचे नामांतर करुन १४ महान व्यक्तींची नावे या आयटीआय संस्थेसाठी जाहीर केले. या निर्णयानुसार बीडमधील आयटीआयला दिवंगत नेते विनायक मेटे यांचं नाव देण्यात आलं आहे. या निर्णयामुळे दिवंगत नेते विनायकराव मेटे यांच्या कार्याचा गौरव झाला. त्यांचे काम आणि नाव भावी पिढीच्या चिरंतर स्मरणात राहील. जिल्ह्यातील जनतेला याचा आनंद झाला (पान २ वर)

# अक्षय शिंदे चकमक प्रकरण....

## सीआयडी चौकशी ससेमिरा सुरु



## सीआयडी पथक मुंब्रा पोलीस ठाण्यात दाखल

ठाणे (वार्ताहर) – सोमवारी संध्याकाळी पुन्हा एकदा हैदराबाद एन्काउंटरची आठवण ताजी झाली. ठाण्याच्या मुंब्रा बायपासवर अत्याचाराच्या आणि शाळकरी मुलींच्या लैंगिक छळाप्रकरणी न्यायालयीन कोठडीतील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलीस चौकशीत मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेने आरोप प्रत्यारोपाचे एकच काहूर माजले. अन स्वरक्षणार्थ गोळीबारात झालेल्या चकमक ही एन्काउंटर की हत्या ? या प्रश्न चिन्हात अडकलेले आहे. अक्षय शिंदे याचा मृतदेह मुंबईच्या जे.जे. रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मंगळवारी घटनास्थळी ठाणे एसआयटी पथक पोहचले तर दुपार नंतर सीआयडी पथक मुंद्रा पोलीस ठाण्यात आणि घटनास्थळी पोहचले आणि चौकशी सुरु झाली.

सोमवारी संध्याकाळी मुंब्रा बायपासवर घडलेल्या चकमक हि वादाच्या भोवऱ्यात सापडलेली आहे. त्यामुळे नागरिकांत विविध चर्चा रंगली . या चकमकीत एकूण चार गोळीबार करण्यात आलेले होते. त्यातील तीन राउंड हे आरोपी अक्षय शिंदे यांनी झाडले. तर एक राउंड स्वसंरक्षणार्थ एसआयटी पथकातील संजय शिंदे यांनी अक्षय शिंदे याच्या दिशेने झाडली. आणि चकमकीत अक्षय शिंदे याचा मृत्यू झाला. एवढे मोठे एन्काउंटर नाट्य मुंब्रा बायपासवर घडले. मात्र गोळीबाराचा आवाजही आसपासच्या लोकांना आला नाही. हे विशेष या घटनेत घडले. त्यामुळे एसआयटी पथकाच्या अधिकाऱ्याच्या सर्व्हिस रिव्हॉल्व्हरचा वापर सायलेन्सर लावून करण्यात आला काय? असा प्रश्नही उपस्थित होत आहे. तर मोठी चर्चा मुंब्रा वायय जंक्शन आणि धबधबा परिसरातील मुंब्रावासीयांमध्ये रंगलेली आहे. तर ज्या वाहनामध्ये चकमक झाली. त्या वाहनामध्ये चार पुंगळ्या सापडल्याची माहिती सूत्रांद्वारे उपलब्ध आहे.

### कुणीही बोलण्यास तयार नाही..

सोमवारी घडलेल्या एन्काउंटर प्रकरणा नंतर प्रसारमाध्यमांनाही पोलीस अधिकारी माहिती देण्यास तयार नाहीत. तर दुसरीकडे मंगळवारी ठाणे पोलिसांच्या वतीने जनसंपर्क पोलीस अधिकारी शैलेश साळवी यांनी पत्रकार परिषद घेऊन पोलिसांच्या बंदूक हिसकावून घेत पोलिसांवर केलेल्या गोळीबारात पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात अक्षय शिंदे याचा मृत्यू झाल्याचा पाढा वाचला. अक्षय शिंदे याने केलेल्या गोळीबाराबाबत मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती दिली. पत्रकारांच्या अन्य प्रश्नाला मात्र शैलेश साळवी यांनी उत्तर देण्यास टाळाटाळ केली.

### जखमींना पाहण्यासाठी नेते मंडळी रुग्णालयात



■ सोमवार रात्रीपासून जखमी असलेल्या दुनिया अधिकाऱ्यांना पाहण्यासाठी पोलीस आयुक्त खासदार नरेश मस्के भाजपचे आमदार संजय केळकर मनसेचे नेते अविनाश जाधव अशा अनेक नेत्यांनी जखमींना भेटून त्यांची विचारपूस केली आहे बरे झाल्यानंतर राज ठाकरे देखील या दोन्ही जखमींची बोलणार आहेत.

### ठाण्यात शक्तिपीठावर शिंदे सेनेच्या वतीने जल्लोष



(छाया – मनोज सिंह)



■ नराधम अक्षय शिंदे याचा खात्मा पोलीस चकमकीत झाल्यानंतर बदलापुरात आणि अन्य ठिकाणी जल्लोष करीत पेढे वाटण्यात आले. तर मंगळवारी ठाण्याच्या स्व. धर्मवीर आनंद दिघे यांच्या शक्ती पिठावर शिंदे सेनेच्या वतीने कार्यकर्त्यांनी फटाक्याच्या आतषबाजीत पोलिसांच्या कारवाईचे समर्थन केले. तर अत्याचार करणाऱ्या नराधमांना जशाच तसे उत्तर देण्याचा निर्धार केला. यावेळी शिवसैनिकांनी संजय शिंदे आज बढो, हंम तुम्हारे साथ है च्या घोषणा दिल्या आणि जल्लोष केला.


### एन्काऊंटर झालेली गाडी ठेवली झाकून

एन्काऊंटर झालेली पोलिसांची मोठी गाडी ही पोलीस मैदानात ठेवण्यात आली असून एसआयटीने त्याची पाहणी केली त्यानंतर या वाहनाला झाकून ठेवण्यात आलेला आहे या वाहनाच्या भोवती बेरिकेटिंग देखील करण्यात आले आहे पुढील काही दिवस तपास आणि चौकशी पूर्ण होई पर्यंत हे वाहन पोलीस मैदानातच राहणार आहे संध्याकाळच्या सुमारास भर पावसात मुंब्रा पोलीस आणि सी. आय. डी. चे पथक या वाहनाची तपासणी करत होते.

### घटनास्थळी एसआयटी तर मुंब्रा पोलीस ठाण्यात सीआयडी

सकाळी एसआयटी पथक मुंब्रा येथील घटनास्थळी पोचले घटनास्थळाची पाहणी करून ज्या व्हॅनमध्ये फायर झालेल्या चार राउंडच्या पुंगळ्या सापडल्या. त्याची पहाणी केली. तर दुपारनंतर मुंब्रा पोलीस ठाण्यात सीआयडी पथक दाखल झाले. मुंब्रा पोलीस ठाण्यात चौकशी करीत घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचे छायाचित्रण करीत घटनास्थळाचे व्हिडीओ चित्रणही करण्यात आलेले आहे. तर पोलीस व्हॅनची तपासणी आणि पाहणी करण्यात आली. त्यामुळे आता या प्रकरणात सीआयडी चौकशीचा ससेमिरा सुरु झाल्याचे चित्र आहे.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## वाढत्या प्रदूषणाचे घातक परिणाम

वाढते प्रदूषण, घरोघरी अगरबत्ती, सुगंधित अगरबत्ती, मच्छर अगरबत्ती, कापूर, धूप यांच्या ज्वलनाने घरातील प्रदूषण आदींचा वाढता वापर, पचनाशी संबंधित समस्या आणि कार्यालयीन स्थळी असलेले रासायनिक घटक आदी विविध कारणांमुळे धूम्रपान न करणाऱ्यांना फुफ्फुसाचा कर्करोग होण्याचे प्रमाण वाढत असलेले दिसत आहे. धूम्रपान न करणाऱ्या ३० ते ४० वयोगटातील पुरुष आणि स्त्रियांना सतत खोकला होत असून फुफ्फुसाच्या कर्करोगाचे निदान होत आहे. यावरून केवळ धूम्रपान करणाऱ्यांनाच नव्हे, तर निर्व्यसनी व्यक्तीही फुफ्फुसाच्या कर्करोगाचे बळी ठरत आहेत. वाढते प्रदुषण त्यास कारणीभूत ठरत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. प्रदूषणाला आळा घालणे प्रत्येकाच्या हातात आहे, परंतु तशी इच्छाशक्ती हवी आहे. भारतामध्ये २०२५ पर्यंत फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या प्रकरणात सातपटीने वाढ होण्याची भीती भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर) संशोधकांनी व्यक्त केली आहे. पूर्वी वृध्दांना फुफ्फुसाचा कर्करोग होत असल्याचे निदर्शनास आले होते. मात्र आता तरुणांमध्ये फुफ्फुसाचा कर्करोग होत असल्याचे आढळत आहे. २० वर्षांपूर्वी फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या रुग्णांमध्ये धूम्रपान करणाऱ्यांचे प्रमाण अधिक होते. मात्र मागील १० ते १२ वर्षांमध्ये परिस्थिती बदलली असून कधीही धूम्रपान न केलेल्या व्यक्तींनाही फुफ्फुसाचा कर्करोग होत असल्याचे आढळत आहे. पूर्वी फुफ्फुसाचा कर्करोग असलेल्या १० रुग्णांमध्ये ८ जण धूम्रपान करणारे आणि दोन जण धूम्रपान न करणाऱ्यांचा समावेश होता. मात्र आता फुफ्फुसाचा कर्करोग असलेल्या १० रुग्णांपैकी ५ जण धूम्रपान करणारे आणि ५ जण धूम्रपान न करणाऱ्यांचा समावेश असल्याचे आढळत आहे. वाढत्या प्रदुषणामुळे धूम्रपान न करणाऱ्यांनाही फुफ्फुसाचा कर्करोग होत असल्याचे निदर्शनास आले आहे. पूर्वी ग्रामीण भागात चुलीवर जेवण बनवणाऱ्या महिलांना फुफ्फुसाचा कर्करोग होण्याचा धोका होता. मात्र आता महिलांमधील फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, असे फुफ्फुसविकार तज्ज्ञानी म्हटले आहे. निरनिराळ्या कारणांमुळे घरातील प्रदुषणात वाढ होत आहे. त्यामुळेच धूम्रपान न करणाऱ्या ४० ते ५० वयोगटातील नागरिकांमध्ये फुफ्फुसाचा कर्करोग वाढत आहे. त्यास घरांतील धूर, वायू प्रदुषण कारणीभूत ठरत आहे. अगरबत्ती, सुगंधित अगरबत्ती, मच्छर अगरबत्ती, कापूर, धूप यांच्या ज्वलनाने घरातील प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे श्वसनाचे विविध आजार वाढत आहेत. घरात धूर करणाऱ्या घटकांचा वापर टाळून प्रदुषण कमी करता येऊ शकते. सध्या वातावरणात विविध प्रकाराचा धूर, वातावरणातील धुरके, हवेतील कार्बन कण याचा परिणाम मानवी शरीरावर होत आहे. तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकणारा खोकला आढळल्यास त्वरित वैद्यकिय सल्ला घ्या. खोकला क्षयरोग, दमा किंवा फुफ्फुसाचा कर्करोगास कारणीभूत ठरू शकतो. क्ष किरण तपासणीमध्ये काही दोष आढळल्यास अचूक निदानासाठी सीटी स्कॅन किंवा बायोप्सी करता येते. हवेतील प्रदूषणामुळे जगभरातील लाखो लोकांना त्वचा रोग, फुफुसाचे, श्वसनाचे विकार जडले आहेत. हवेतील वायू प्रदूषण हे मानवासमोर भवितव्यातील मोठे शंका असणार आहे, असे दिसते.

### हवामान खात्याचा अंदाज

**(पान १ वरून)** बंगालच्या उपसागरातील हवामान विषयक स्थितीचा परिणाम म्हणून पूर्व किनारपट्टीवर जोरदार पाऊस असल्याने पुढील चार दिवस वादळी वारे, मेघगर्जनेसह विदर्भ, मराठवाडा आणि कोकण किनारपट्टीवर मुसळधारेचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

### 'क्लस्टर'च्या माध्यमातून होणार....

**(पान १ वरून)** रहिवासी हे जीव मुठीत धरुन धोकादायक इमारतीत राहत आहेत. काही विघ्नसंतोषी लोकांना त्याचे गांभीर्य नसल्यामुळे स्वत:च्या स्वार्थासाठी ते इतर सभासदांना भडकवत आहेत. तसेच मॅनेजिंग कमिटीला विचारात न घेता बिल्डरला त्रास देऊन डेव्हलपमेंट थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप सोसायटीचे अध्यक्ष अनिल गुलाटी यांनी केला आहे. मे. यश अशोका डेव्हलपरची नियुक्ती बहुमताने ऊऊ च्या उपस्थितीत केली आहे. त्यांनतर आम्ही एकमताने क्लस्टर योजनेला मान्यता दिलेली आहे. क्लस्टरला एकमताने मान्यता दिली म्हणून मे यश अशोका यांनी डजख आणि इतर कायदेशीर बाबी पूर्ण करुन ते कार्य करत आहेत. कमिटी आणि सभासादांचा मे. यश अशोका डेव्हलपरला दौलत नगर डेव्हलपमेंट कामासाठी पूर्णपणे पाठिंबा आहे, असे सोसायटीचे अध्यक्ष अनिल गुलाटी यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या अटी व शर्तीप्रमाणे आम्ही दौलत नगर कमिटी मेंबर व सभासदांनी शासनाने जी नियमावली क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी दिलेली आहे त्याचे पालन करुन कायदेशीर बाबी पूर्ण करुन काम करत आहोत. आज क्लस्टरच्या माध्यमातून दर्जेदार घर, रस्ते तसेच स्विमिंग पूल, उद्याने व इतर अनेक सुविधा मिळून संपूर्ण दौलत नगर रहिवाश्यांचे घराचे स्वप्न साकार होत आहे. यासाठी आम्ही मे. यश अशोकाचे आभारी आहोत, असे सचिव महेश करणा यांनी सांगितले.

क्लस्टर योजने अंतर्गत बिल्डरने २५ टक्के वाढीव क्षेत्र देण्यास बंधनकारक आहे. परंतु मे. यश अशोका बिल्डरकडून ३२ टक्के वाढीव क्षेत्र मंजूर करुन घेतले आहे. सध्याच्या परिस्थितीत दौलत नगर मधील सर्व इमारती निकसीत (रिकाम्या) केल्या नसताना मे. यश अशोका हे भाडे देण्यास बांधील नसतानाही बिल्डर जे फ्लॅटधारक फ्लॅट खाली करून गेले आहेत त्यांना भाडे देत आहे. आज काही मुठभर सभासद सदर डेव्हलपमेंटच्या कामामध्ये अडथळा आणण्याच्या उद्देशाने इतर सभासदांना एका नामांकित बिल्डरला अर्धवट व चुकीची माहिती देऊन ते नामांकित बिल्डर दौलत नगरचा डेव्हलपमेंटचे काम करण्यात इच्छुक आहेत, असे सांगत आहेत. परंतु त्या बिल्डरला सत्यता कळल्यानंतर त्यांनी दौलत नगरच्या डेव्हलपमेंटचे काम करण्यास असमर्थता दर्शवली आहे. काही रहिवांशानी कमिटीची परवानगी न घेता त्यांच्या सदनिका भाड्याने दिल्या आहेत व अश्याप्रकारे बऱ्याच बेकायदेशीर गोष्टीची परवानगी कमिटी देत नसल्यामुळे कमिटीच्या विरोधात काही स्वार्थी रहिवाशांनी बनाव करुन निरर्थक कलह निर्माण करत आहेत. आज हे विरोध करणारे ५ ते ८ रहिवाशी क्लस्टरला ९ महिन्याआधी मिटींगला हजर होते. त्याच रहिवाशांनी इतर रहिवाश्यांसोबत क्लस्टरला मान्यता दिली होती. त्याचे पुरावे फोटोज आणि व्हिडीओ यावेळी पत्रकार परिषदेत सादर करण्यात आले. या सर्व अडथळ्यांना न जुमानता आम्ही बिल्डरसोबत क्लस्टरला जात आहोत. आज प्रसार माध्यमातून वैभव भोसले यांचे असे म्हणणे आहे की आमच्या सोसायटी चां पुनर्विकास क्लस्टरअंतर्गत होत आहे याची कल्पना आज आम्हाला मिळाली, पण २६ नोव्हेंबर २०२३ च्या मीटिंगमध्ये आपण क्लस्टर अंतर्गत पुनर्विकास करणार आहोत असे व्यक्तव्य स्वतः भोसले यांनी सर्व सभासदासमोर सोसायटी च्या विशेष सर्वासधरण सभेत केले आहे सोसायटीच्या एसजीएममध्ये दौलत नगरची डेव्हलपमेंट ही क्लस्टर योजनेमध्ये होणाऱ्या चर्चेत वैभव भोसले सहभागी झालेले आहेत. शोभा नारवानी यांनी विकासक मे. यश अशोका यांचे स्वागत केले आणि सदर क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत. तसेच सोसायटीचे सभासद व प्राध्यापक श्री अल्हाद जोशी यांनी क्लस्टर योजनेबद्दल सर्वांच्यावतीने सदर क्लस्टर योजना मान्य असल्याचे सांगितल्याचे व्हिडीओ चित्रीकरणात दिसत आहे. याच मिंटीगमध्ये चेअरमन अनिल गुलाटी यांनी सर्वांना क्लस्टर योजना मान्य केले असल्याचे घोषित केले व सर्व उपस्थित सभासदांचे आभार व्यक्त करून त्या मिंटीगची सांगता केली, तेव्हा कोणीही सभासदांनी विरोध केला नसल्याचे स्पष्टीकरण यावेळी कार्यकारिणीच्या वतीने देण्यात आले व तसेच व्हिडिओ चित्रीकरणात दिसून आले.

त्यामुळे अशा प्रकारे कमिटीला विश्वासात न घेता इतर सभासदांची व प्रसार माध्यमांची परस्पर दिशाभूल करण्याचा व स्वतःचा हेतू साधण्याचा प्रयत्न हे विघ्नसंतोषी लोक करत आहेत.

### ..... दिवंगत नेते विनायक मेटे यांचं नाव

**(पान १ वरून)** असून सर्व स्तरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे. पुन्हा एकदा जय शिवसंग्राम संघटनेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस मा. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि महायुती सरकारमधील घटक पक्षाचे आकाश जाधव यानी आभार मानले आहेत.

बाळकुम येथील बंद तरण..तलावात ठाणेकर मारणार सूर..

# तरण तलाव खुला करण्यासाठी आमदार संजय केळकर यांचा अल्टीमेटम

ठाणे - बाळकुम येथील धर्मवीर आनंद दिघे तरण तलाव मागील दोन वर्षांपासून बंद असून ठाणेकर या सुविधेपासून वंचित आहेत. हा तलाव १ ऑक्टोबरपर्यंत खुला न केल्यास नागरिकांना घेऊन या तरण तलावाचा वापर सुरू करू, असा इशारा आमदार संजय केळकर यांनी दिला आहे.

गेली दोन वर्षे बंद असलेल्या आणि वादग्रस्त ठरलेल्या बाळकुम येथील तरण तलावाची पाहणी आमदार संजय केळकर यांनी अधिकाऱ्यांसह केली. ३० कोटी खर्च करून उभारलेल्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तरण तलावाचे उद्घाटन २०२२ साली झाले. मात्र यावर झालेला कोट्यवधींचा खर्च आणि कामातील त्रुटी यामुळे यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत होता. शिवाय गेली दोन वर्षे त्याचा वापर करण्यास खुला करण्यात न आल्याने ठाणेकर या सुविधेपासून वंचित राहिले आहेत.

या तरण तलावाच्या कामाची पाहणी आमदार संजय केळकर यांनी गेल्या दोन वर्षांत चार ते पाच वेळा करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. तसेच झालेल्या कामांबाबत संशय व्यक्त करून प्रशासनाच्या अक्षम्य दिरंगाईबाबत संताप व्यक्त केला होता.

आज सोमवारी केळकर यांनी केलेल्या पाहणीत अधिकाऱ्यांना चांगलेच झापले. अजून काही त्रुटी शिल्लक असून या कामांबाबतच्या कागदपत्रांची मागणी त्यांनी केली. तसेच येत्या १ ऑक्टोबरपर्यंत हा तरण तलाव खुला करावा अन्यथा नागरिकांना घेऊन त्याचा वापर सुरू करू, असा इशाराच केळकर यांनी दिला.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कलाल, उप अभियंता रोहित गुप्ता, उपायुक्त मीनल पालांडे, तसेच तरण तलाव विभाग आणि प्रभाग समितीचे संबंधित अधिकारी, भाजपचे रवी रेड्डी, ड.हेमंत म्हात्रे, तन्मय भोईर, भानुदास भोईर, भावेश पाटील, अनुराधा रोकडे, मेघनाथ घरात, आदी पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कला भवनचे कुलूप कधी उघडणार?

तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी उद्घाटन केलेले कलाभवन गेली काही वर्षे नादुरुस्त अवस्थेत असून धूळ खात पडले आहे. हे शहर सांस्कृतिक असून येथे अनेक कलाकार आणि कला रसिक नागरिक आहेत. याची दुरुस्ती करून ठाणेकरांना ते तातडीने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी अनेक वेळा केली आहे. अशा अनेक वास्तूंच्या कामात भ्रष्टाचार होऊन त्या धूळ खात पडल्या असल्याची माहिती केळकर यांनी दिली.

### सिनेटमध्ये कोण बसणार?

**(पान १ वरून)** कोण लढणार? कोण विद्यार्थ्यांचा आवाज विद्यापीठ प्रशासनापर्यंत पोहोचविणार? या कळीच्या प्रश्नांची उत्तरे २७ सप्टेंबरला निकाल जाहीर झाल्यानंतर मिळतील. दरम्यान, मतदारांची मने वळविण्यासाठी युवासेना आणि अभाविप या दोन्ही संघटनांच्या उमेदवारांनी सोशल मीडियापासून ते व्हॉइस कॉलपर्यंत सगळ्या प्रचार प्रकारांचा वापर केला आहे. अभाविप आणि युवासेना यांच्याबरोबरच बहुजन विकास आघाडी आणि छात्रभारती याही संघटना रिंगणात आहेत. युवासेनेकडून खुल्या वर्गातून ५, तर इतर प्रवर्गांतून ५ असे एकूण १० उमेदवार रिंगणात उतरविण्यात आले आहेत. २०१८च्या निवडणुकीत युवासेनेने बाजी मारून १० सदस्य निवडून आणले होते. यंदा अभाविपने युवासेनेला चितपट करण्यासाठी कंबर कसली आहे.

#### ठाकरे गटाची युवा सेना आणि अभाविपमध्ये थेट लढत,

**(पान १ वरून)** आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने एकाही उमेदवार उभा केलेला नाही. त्यामुळे, यंदाची अधिसभा निवडणूक ही थेट युवासेना (ठाकरे गट) विरूद्ध अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यापीठ विकास मंच यांच्यात होत आहे. अपक्ष उमेदवारांची मतेही निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/13524/18/24
Inquiry/case No. : ACC/I/994/2024
Name of the Trust : शिव शक्ती प्रतिष्ठान
**Address of the Trust : एच नं. १२८०, आनंद धाम, तुर्भे पाडा, ब्रहमण्द पीएच-८, समोर, घोडबन्दर रोड, ठाणे (डब्ल्यु), ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : दिपाली सहदेव म्हेत्रे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 20/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## मुंबईत ओवेसी आपल्या पार्टीचे मुंबई अध्यक्ष रईस लष्करिया यांच्यासमवेत एका जाहीर सभेला संबोधित करणार

मुंबई - वक्फ बोर्ड प्रकरणी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलमीन (एआयएमआयएम) चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि खासदार असदुद्दीन ओवेसी मुंबईत पोहोचले असून वर्सोवा विधानसभा मतदारसंघात जाहीर सभेला संबोधित करणार आहेत.

एआयएमआयएमचे मुंबई अध्यक्ष रईस लष्करिया यांनी त्यांच्या स्वागताची पूर्ण तयारी केली आहे.

आज एचकेबी लॉन, जफर भाई दिल्ली दरबार हॉटेल, ओबेद मेडिकलजवळ, एस व्ही रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई येथे ही बैठक आयोजित केली जाईल.

रईस लष्करिया यांनी सर्व जनतेला आवाहन करत या जाहीर सभेत आपण सर्वांनी आपली उपस्थिती अनिवार्यपणे नोंदवावी आणि ओवेसी साहेबांचा आगमन कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन केले.

एआयएमआयएम मुंबईच्या मुख्य कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात ही माहिती देण्यात आली आहे.



**CHANGE OF NAME**

I have change my name from KRISHNA JYOTIBA PATIL to KRISHNA JOTIBA PATIL . as per affidavit. Resident of - At A 17 4th Floor Rupchand Apartment Ghodbunder Road Opp Ashapura Mandir Kapurbaudi Thane West (M-24193113)

**नवी मुंबई महानगरपालिका**

**उद्यान विभाग**

**निविदा सुचना क्र. नमुंमपा/उद्यान/ब-1/ 09 /2024-25**

**कामाचे नाव :- कोपरखैरणे विभागातील स्व. शिवाजीराव पाटील उदयान से.4ए येथील उदयानाचे नुतनीकरण करणे.**

**अंदाजित रक्कम रू. :- 30,27,554/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.25/09/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे निविदेकरीता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर üOnline करण्याचे आहे. ई निविदा ई-टेंडरिंग (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे**

**कोणत्याही निविदा स्विकारणे अथव नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही /-
**उप आयुक्त (उद्यान)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/451/2024

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
कंत्राटी पध्दतीने पदभरतीबाबत जाहिर सूचना
जाहिर सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील " शस्त्रक्रिया सहाय्यक,न्हावी, ड्रेसर, वॉर्डबॉय, दवाखाना आया, पोस्टमार्टम अटेंडन्ट व मॉच्युरी अटेंडन्ट " संवर्गातील पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर १७९ दिवसाच्या कालावधीसाठी भरण्याकरीता जनादेश, पुण्य नगरी, महाराष्ट्र सम्राट व लोकमत या वर्तमान पत्रामध्ये जा.क्र.ठामपा/पिआरओ/आस्था/५४८/२०२४-२५, दि.२०/०९/२०२४ रोजी तसेच ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरची भरती प्रक्रिया प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात येत असून सदर पदांच्या थेट मुलाखतीचा दिनांक अलहिदा कळविण्यात येईल.

ठामपा/पिआरओ/आस्था/५७८/२०२४-२५ **सही**/-
दि:२४.०९.२०२४ अतिरिक्त आयुक्त -२
**pls visit our official web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ॲवलॉन पार्किंग प्लाझा येथील वैद्यकीय गॅस प्रणाली DISMANTLING, PACKING करुन SHIFTING पार्किंग प्लाझा येथील रुग्णालयतील तळ मजल्यावर स्थलांतरित करणे याकरीता ऑन-लाईन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.२५/०९/२०२४ ते दि. ०३/१०/२०२४ पर्यत संध्याकाळी १६.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील. दि.०३/१०/२०२४ रोजी संध्याकाळी १६.०० वाजेपर्यत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि.०४/१०/२०२४ रोजी संध्याकाळी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील. सर्व निविदा किंवा काही निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार ठाणे महानगरपालिका स्वत: कडे राखून ठेवत आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/५७३/२०२४-२५ सही/-
दि:२४.०९.२०२४ वैद्यकीय आरोग्य अधिकारी
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**




## एस विभागातील पवई मनपा हिंदी-२ शाळेत पालक सभा संपन्न..

मुंबई - आज दिनांक- २३/९/२०२४ रोजी पवई मनपा हिंदी शाळा क्र. ०२ मध्ये पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री शोभनाथ कोरी, उपाध्यक्ष श्री.मोनी चंदन गौर,विभाग निरीक्षक श्री रामचंद्र गोडे सर शाळेचे मुख्याध्यापक श्री भिकन काळुसिंग देवरे, व सर्व शिक्षकवृंद व १५० पालक उपस्थित होते. सदर सभेस अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक श्री भिकन देवरे व उपस्थित शिक्षकवृंदातील श्रीम.अश्विनी ठाकरे,श्री रवींद्रप्रताप सिंह, श्रीम.मीनाक्षी उपासे, श्रीम.संगीता चव्हाण व श्री.कोमल टेभरे यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले.यामध्ये विशेष करून मुलींची सुरक्षा, शैक्षणिक गुणवता, शालेय स्वछता, मध्यानह भोजन, विद्यार्थ्यांची उपस्थिती व गुणवत्ता वाढवण्यासाठी शाळेत घेतले जाणारे विविध उपक्रम सांगण्यात आले.त्याचबरोबर विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षका सोबतच पालकांचेही योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.ह्या भावना शाळेचे मुख्याध्यापक श्री देवरे सरांनी त्यांच्या मनोगतात भावना व्यक्त केल्या..पालकांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री भिकन देवरे व सर्व शिक्षक कठीबद्ध असून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील असे पालकांना आश्वासन देण्यात आले.. ही सभा यशस्वी करण्यासाठी श्री देवीदास पाटिल सर आणि श्रीम अरुणा ठाकरे यांनी योग्य सहकार्य केले. सभा एकदम खेळीमेळी च्या वातावरणात पार पडली. श्री कोमल टेभरे सर यांनी सर्वांचे आभार मानले.. या सभेचे सूत्रसंचालन शाळेच्या वरिष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल त्रिंबककर यांनी केले.सभेचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

**BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION**
**BHIWANDI (Dist. Thane)**
**MAHARASHTRA**
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे, महाराष्ट्र,**
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी - ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/१२९१
दि. २४/०९/२०२४

**बांधकाम विभाग, प्र. स. क्रं १**

**ई-निवीदा सुचना क्रमांक ८६ सन २०२४ / २५**
**(२ रा कॉल)**
**जनरल निधी अंतर्गत सन २०२४-२५**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक :- २५/०९/२०२४ ते दि.:- ०३ /१०/२०२४ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अनु. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १ | भिवंडी पूर्व मतदार संघामधिल प्रभाग क्रं. १ वॉर्ड क्रं. २ रिजवान शेठ चाळ येथील घर क्रं. ३१९ पासून ते मुश्ताक कंपाउंड पर्यंत नवीन गटार व पाथवेज तयार करणे. | ७,९८,४४७/- | ५९०/- |

वरील ऑनलाईन निविदा दि.०३/१०/२०२४ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदा ही दि.०४/१०/२०२४ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोईप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
(सचिन नाईक)
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

■ पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
■ अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
■ शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्त्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
■ परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल

■ पद क्र.
कॉन्स्टेबल/फायर (पुरुष)
■ शैक्षणिक पात्रता: १२वी(विज्ञान) उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता: उंची: १७० सेमी, छाती: ८०-८५ सेमी
■ वयाची अट: ३० सप्टेंबर २०२४ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²:फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.cisf.gov.in

सभासद व्हा
....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

■ पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-IV ३५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
■ फी : ५९/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
■ https://konkanrailway.com/

---


महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार अण्णासाहेब पांडुरंग पाटील यांनी मुंबईमधील विखुरलेल्या कामगारांना एकत्र करून त्यांच्या प्रगतीसाठी भरीव कामगिरी केली. त्यामुळे अण्णासाहेब पाटील यांना महाराष्ट्रात मराठा व माथाडी कामगारांच्या उत्कर्षाचे शिल्पकार म्हटले जाते. अण्णासाहेब पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा मावळा असलेला व महाराष्ट्रात राहणारा प्रत्येक माणूस मराठा आहे अशी संकुचित नव्हे तर विशाल व साधी सोपी मराठ्यांची व्याख्या केली. त्यातून माथाडी कामगार संघटना तथा अखिल भारतीय मराठा महासंघाची स्थापना केली होती. पाटण तालुक्यातील मंद्रूळकोळे गावामधून अण्णासाहेब मुंबईत आले. त्यांनी कामगार म्हणून आपल्या जीवन कार्याला सुरुवात केली होती. त्यावेळी मुंबईत कामगारांची अवस्था अत्यंत बिकट होती. तसेच मुंबईमधील बहुतांश कामगार वर्ग हा मराठा होता. कामगारांचा आर्थिक व सामाजिक उत्कर्ष झाला पाहिजे, असे त्यांना नेहमी वाटत असे. त्यांनी कामगारांचे प्रश्न व त्यांच्या समस्याचा अभ्यास केलाय कामगारांना संघटीत करण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रयत्नांना यश आले. कामगारांच्या प्रश्नावर त्यांनी सखोल अभ्यास करून संघटीत प्रयत्न करण्यासाठी माथाडी कामगार संघटना स्थापना केली. महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन (रजि.) ही कष्टकरी कामगारांची मोठी संघटना उभी केली. त्यावेळी कामगार क्षेत्रात केवळ कम्युनिस्ट संघटना होत्या. परंतु त्यांनी कम्युनिस्ट विचाराला मूठमाती देऊन या मातीमधील सर्वंकष विचार मांडून कामगार संघटना स्थापन केली होती. कामगार हितासाठी मोर्चे, आंदोलन सुरू झाले. सरकार दरबारी कामगारांच्या मागण्या मांडल्या जाऊ लागल्या. कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या मागणीचा सरकार दरबारी सकारात्मक विचार होऊ लागला. त्यातून अण्णासाहेब पाटील यांचे नेतृत्व उदयास येऊन ते कामगारांचे आराध्यदैवत ठरले.

### कम्युनिस्ट नव्हे तर मातीमधील विचार मान्य

अण्णासाहेब पाटील यांनी जेव्हा माथाडी कामगार संघटना उभी केली. तेव्हा कामगारांच्या अनेक समस्या होत्या. श्रममूल्य, पुरेशा वेतनाचा अभाव, आरोग्य सुविधा आणि हक्क अशा समस्या होत्या. कामगारांचे प्रचंड शोषण व पिळवणूक होत होती. तसेच महाराष्ट्रात कम्युनिस्टांच्या लाल बावटा युनियनचा बोलबाला होता. परंतु अण्णासाहेब पाटील यांनी कम्युनिस्टांच्या लाल बावटा युनियनची मदत न घेता प्रचंड मेहनत घेऊन या मातीसोबत इमान राखणाऱ्या मराठी माणसांची कामगार संघटना उभी केली होती. त्यासाठी त्यांनी कामगारांच्या समस्या आणि हक्कांचा अभ्यास करून कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारला. माथाडी कामगार संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. राज्य सरकारच्या दरबारी माथाडी कामगारांच्या व्यथा मांडून त्यांच्या हक्कासाठी जीवाचे रान केले. अण्णासाहेब पाटील यांचा जन रेटा इतका प्रभावी होता की तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण करून माथाडी संघटनेला शासकीय दर्जा प्राप्त करून दिला. ५ जून १९६९ रोजी महाराष्ट्रामध्ये माथाडी कामगार कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनात आनंदाचे क्षण येऊ लागले. माथाडी कामगार कायद्यामुळे नवी मुंबईमध्ये माथाडी हॉस्पिटल, माथाडी ग्राहक सोसायटी, सिडकोमार्फत घरे, उच्च शिक्षण, वैद्यकीय सेवा, पतपेढी अशा विविध सुविधामुळे कामगार व त्यांच्या परिवारांचे जीवनमान उंचावले गेले. माथाडी कामगारांच्या कल्याणामध्ये अण्णासाहेब पाटील यांचे योगदान महत्वाचे होते.

मराठा आरक्षण मोर्चाचे जनक

# मराठा उत्कर्षाचे शिल्पकार अण्णासाहेब पाटील!



### अण्णासाहेब

महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. महायुतीचे सरकार सकारात्मक असतानाही, समाजात भेद निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु, मराठा आरक्षणाचे जनक अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणाची मागणी करताना अवास्तव मागण्या किंवा सामाजिक वीण कधीही विस्कळीत होऊ दिली नाही. त्यामुळे महाराष्ट्रात अण्णासाहेबांना आदराचे स्थान आहे. त्यांनी बहुतांश मराठा कामगार असलेल्या माथाडी कामगारांच्या कल्याणासाठी प्रचंड कष्ट घेतले. त्यांची प्रतिमा उभ्या महाराष्ट्रात निर्माण झाली होती. त्यांनी बारा बलुतेदार व अठरा पगड जातींना एकत्र करून मराठ्यांचे संघटन उभे राहावे, म्हणून अनेक संस्था संघटना आणि मंडळांना एकत्र आणले. अखिल भारतीय मराठा महासंघाची स्थापना केली होती. अण्णासाहेब यांचे सक्षम व लोकप्रिय नेतृत्व लक्षात घेऊन त्यांची ८ जुलै १९८० रोजी विधान परिषदेच्या सदस्यपदी नियुक्ती झाली होती. त्यावेळी मराठा समाजाला आर्थिक निकषावर आधारित आरक्षण मिळावे , अशी मागणी जोर धरत होती. त्यावेळी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करून आर्थिक निकषावर मराठा आरक्षण मिळावे, म्हणून विधीमंडळावर मोर्चा काढण्याचा निश्चय केला. काँग्रेस सरकारमध्ये आमदार असताना अण्णासाहेब पाटील व ॲड. शशिकांत पवार यांच्या नेतृत्वात आझाद मैदान येथून शिवरायांचा भगवा हातामध्ये घेऊन २२ मार्च १९८२ रोजी विराट मोर्चा विधानसभेवर धडकला. या मोर्चातील हजारोंच्या जनसमुदायाने मुंबईकरांचे लक्ष वेधले. अण्णासाहेब पाटील यांनी तत्कालीन मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना नऊ मागण्याचे निवेदन सादर केले. आरक्षण मागणीचा विचार होणार नाही, हे लक्षात येताच मराठा समाजाला न्याय न मिळाल्यास आपण उद्याचा सूर्योदय पाहणार नाही, असे ठणकावून सांगितले. आपल्या प्रतिज्ञेनुसार त्यांनी २३ मार्च १९८२ रोजी जीवन यात्रा संपवून जगाचा निरोप घेतला.

### मराठा उत्कर्षाचे शिल्पकार

अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या उत्कर्षासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. त्यांच्या समस्या सरकार दरबारी मांडून कामगारांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण केले होते. तसेच मराठा समाजाला आर्थिक निकषावर आरक्षण मिळावे, म्हणून त्यांच्या समस्यावर सरकार तथा सामान्य माणसाचे लक्ष वेधण्यासाठी पुढाकार घेतला. अण्णासाहेब पाटील यांच्या जीवन कार्याचा विचार केल्यास किंवा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की त्यांचं संपूर्ण आयुष्य समाजासाठी संघर्ष करण्यात खर्ची झाले होते. खऱ्या अर्थाने ते मराठा आरक्षणाचे जनक तथा मराठ्यांच्या उत्कर्षाचे शिल्पकार ठरतात. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन.

**- निरंजन डावखरे,**
आमदार, भाजपा,
कोकण पदवीधर मतदारसंघ

---

आशियातील सर्वात मोठ्या एपीएमसीच्या पाचही मार्केटमध्ये

# ४ हजारहून अधिक नागरिकांनी राबविले महास्वच्छता अभियान

नवी मुंबई : आशियातील सर्वात मोठया एपीएमसी मार्केटमध्ये लोकसहभागातून नवी मुंबई महानगरपालिका आणि मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये नमुंमपा व एपीएमसी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह लोकप्रतिनिधी, स्वच्छताकर्मी, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, युवक, विद्यार्थी आणि स्वच्छताप्रेमी नागरिक यांनी ४ हजारहून अधिक मोठया संख्येने सहभागी होत हे भव्यतम अभियान यशस्वी केले.



यामध्ये विशेषत्वाने विविध महाविद्यालयांचे एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याप्रमाणे एपीएमसी मार्केटमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांनी ते ज्या मार्केटमध्ये काम करतात तेथील स्वच्छता मोहीमेत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वच्छतामित्र तसेच एपीएमससी मार्केट्सचे स्वच्छताकर्मी यांनीही अभियान यशस्वी करण्यात योगदान दिले. विविध स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व सदस्यही मोठ्या संख्येने या स्वच्छता मोहीमेत सक्रिय सहभागी झाले.

एपीएमसी मार्केट मधील कांदा बटाटा मार्केट येथे अभियानाचा शुभारंभ करताना महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्यासह उपस्थितांनी स्वच्छता व प्लास्टिकमुक्तीची सामुहिक शपथ ग्रहण करीत स्वच्छतेस प्रारंभ केला. भाजीपाला मार्केट, फळ बाजार, मसाला मार्केट, दाणा बाजार अशा पाचही मार्केटमध्ये सखोल स्वच्छता मोहीम व्यापक जनसहभागातून राबविण्यात आली.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत संपूर्ण देशभरात 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा साजरा करण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने व्यापक लोकसहभागावर भर देत दररोज विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबवितांना त्यामध्ये विद्यार्थी सहभागावर भर दिला जात आहे.

ज्या ठिकाणाहून अन्नधान्य, भाजी, फळ पुरवठा होतो अशा मार्केटमधील स्वच्छता ही नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट असल्याचे अधोरेखीत करीत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छता ही दैनंदिन जीवनात अंगिकारण्याची गोष्ट असल्याने त्यादृष्टीने नागरिकांनी स्वच्छता ही आपली सवय, आपला स्वभाव बनवावा असे आवाहन केले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छताकर्मीप्रमाणेच एपीएमसी मार्केटमधील स्वच्छताकर्मींच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आरोग्य तपासणी शिबिराचे तसेच तंबाखूमुक्ती जनजागृती शिबिराचे आयोजन महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल असेही आयुक्तांनी सांगितले.

या महास्वच्छता अभियानामध्ये महानगरपालिकेच्या वतीने मॅकेनिकल स्विपींग मशीन, जेटींग मशीन, डस्ट सप्रेशन व्हेईकल, सक्शन युनीट, जेसीबी, डम्पर, कचरा संकलनाच्या घंटागाड्या आदी वाहनांचाही वापर करण्यात आला. जेटींग मशीनव्दारे एपीएमसी मार्केट परिसर स्वच्छ करण्यात आला. विशेषत्वाने भाजीपाला मार्केटमधील प्लॅटफॉर्मची सफाई करण्यात आली. त्यासाठी प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात आला. त्याचप्रमाणे निर्जंतुकीकरणही करण्यात आले. अडगळीच्या जागांचीही सफाई करण्याकडे विशेष लक्ष देण्यात आले. यावेळी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी एपीएमसीचे सचिव डॉ.पी.एल. खंडागळे यांच्यासह भाजीपाला मार्केटची अंतर्गत व परिसर पाहणी करुन त्याठिकाणी नियमित स्वच्छता राहील अशाप्रकारे सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना केल्या.

---

सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प स्थळाला दिली भेट

# प्रकल्पाच्या गतिमान अंमलबजावणीकरिता अधिकाऱ्यांना दिले निर्देश



नवी मुंबई : अध्यक्ष संजय शिरसाट, सिडको यांनी दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प स्थळाला भेट देऊन प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. या प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संतालक, शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, दिलीप ढोले, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्रीमती गीता पिल्लई, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ), सिडको, श्रीमती शीला करुणाकरन, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प व विशेष प्रकल्प) सिडको आणि विमानतळ प्रकल्पाशी संबंधित सिडकोचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

> सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा राष्ट्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाचा प्रकल्प आहे. नवी मुंबईसह राज्याच्या आणि देशाच्या विकासाकरिता हा प्रकल्प योगदान देणार आहे. प्रकल्पाच्या कामाची प्रगती समाधानाकारक आहे. प्रकल्पाच्या गतिमान अंमलबजावणीकरिता कालमर्यादेमध्ये कामे पूर्ण करण्याचे संबंधितांना निर्देशही देण्यात आले आहेत. यामुळे लवकरच येथून विमानाचे उड्डाण होणार आहे.
> –संजय शिरसाट, अध्यक्ष, सिडको

सिडकोतर्फे ११६० हेक्टर क्षेत्रावर, दोन टप्प्यांमध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वांत मोठे ग्रीनफिल्ड विमानतळ साकारण्यात येत आहे. सदर विमानतळ हे प्रती वर्ष ९० दशलक्ष प्रवासी आणि २.५ टन मालवाहतुकीकरिता नियोजित आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे विमानांच्या स्वतंत्र प्रवर्तानाकरिता दोन समांतर धावपट्ट्या आणि पूर्ण लांबीचे दोन समांतर टॅक्सी वे असणार आहेत. सार्वजनिक खासगी भागीदारीतून विकसित करण्यात येत असलेल्या विमानतळाच्या विकासाची जबाबदारी सवलतधारक कंपनी एनएमआयएएल यांच्यावर आहे. विकासपूर्व कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष विमानतळाच्या कामाला सुरुवात झाली आहे. नुकतीच विमानतळ प्रकल्प स्थळी भारतीय विमानतळ प्राधिकरणातर्फे घेण्यात आलेली सिग्नल चाचणी व इन्स्ट्रूमेंट लँडिंग सिस्टीम चाचणी यशस्वीरीत्या पार पडली.

या भेटीदरम्यान मा. अध्यक्ष यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत सिडकोचे अधिकारी व सवलतधारक एनएमआयएएलच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी नियोजित वेळेत पूर्ण व्हावी याकरिता संबंधितांना निर्देश दिले.

---

बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या

# रिपब्लिकन चळवळीसाठी शेवटपर्यंत कार्य करणार: जयदीप कवाडे

ठाणे : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन चळवळीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्य करणार असा, असे प्रतिपादन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी केले आहे. सोमवारी सायंकाळी नागपुरातील आनंद नगरातील पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या मुख्य कार्यालयात जयदीप कवाडे यांचा वाढदिवस युवा चेतना दिन म्हणून साजरा करण्यात आले. भव्य सत्कार सोहळयात लाँग मार्च प्रणेते व पीरिपाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे सर यांच्या हस्ते भाई जयदीप कवाडे यांना शॉल व पुष्पहार देउन सत्कार करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष चरणदास इंगोले, महाराष्ट्र प्रदेश महासचिव बापूराव गजभारे, प्रदेश संघटक कपिल लिंगायत, प्रदेश उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी, सौ. रंजना कवाडे, शहर अध्यक्ष कैलाश बोंबले, जिल्हाध्यक्ष नरेंद्र डोंगरे यांच्यासह विदर्भ व जिल्हयातील कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित होते.

याप्रसंगी बोलतांना जयदीप कवाडे म्हणाले की, परदेशातून राहुल गांधीच्या विधानातून काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा समोर आला आहे. बाबासाहेबांच्या विरोधातील काँग्रेसी विचार हे यातून दिसून आले आहे. विरोधी पक्षाची धुरा सांभाळणाऱ्या नेत्याकडून असे वक्तव्य हे त्यांची भविष्यातील योजना आरक्षणाला संपविण्याचे घाट असल्याचे स्पष्ट होत आहे. यापूर्वी गांधी परिवाराची परंपरा ही बाबासाहेबांच्या विचारांच्या विरोधी होती. त्याच घराण्याची परंपरा जपण्याचे काम राहुल गांधी करीत आहे. बाबासाहेबांच्या आरक्षणला संपविणारे खरे काँग्रेसी आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व त्यांच्यासोबत असलेल्या पक्षांना अद्दल घडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे, असेही जयदीप कवाडे यावेळी म्हणाले.

### कार्यकर्त्यांकडून मिळालेले प्रेम हाच खरा सत्कार

'रिपब्लिकन' हा एकमेव राजकीय पर्याय डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला दिला आहे. रिपब्लिकन लोकांना शासनकर्ती जमात बनवण्याची आता हिच ती वेळ आहे, असे कवाडे यावेळी म्हणाले. आंबेडकरी रिपब्लिकन चळवळीमध्ये समाजाच्या उध्दारासाठी पाच पिढ्यांपासून कवाडे कुटुंबिय समर्पित आहे. हे सर्व करीत असताना इतर राजकीय रंग, चळवळ बघितली. परंतु, खऱ्या अर्थाने बाबासाहेबांची रिपब्लिकन ही संकल्पना साकार करण्याचे कार्य पीपल्स रिपब्लिकन पार्टी करीत असल्याचे प्रतिपादन त्यांनी यानिमित्त केले. देशातील आणि राज्यातील युवकांना पक्षात मोठ्या प्रमाणात नेतृत्व देण्यात येणार आहे. पार्टीच्या विस्तार करण्यासाठी तरूण कार्यकर्त्यांवर मोठी जबाबदारी येत्या काळात देण्यात येणार असल्याचे जयदीप कवाडे यावेळी म्हणाले. कार्यकर्त्यांकडून मिळालेले प्रेम हाच खरा सत्कार असल्याची भावना त्यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ३० सप्टेंबर रोजी मिरा भाईंदरमधील

# पहिल्या दोन म्युझिकल फाउंटनचे लोकार्पण

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील २ तलावांचे सुशोभीकरण करून त्यात 'म्युझिकल फाउंटन' बसविण्याचे काम पूर्ण झाले असून ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सायंकाळी या म्युझिकल फाउंटनचे लोकार्पण होणार आहे. मीरा भाईंदर शहरात पहिल्यांदाच इतक्या भव्य प्रमाणात हे संगीत कारंजे बसवले गेले असून यामुळे तलावासोबतच परिसराच्या व शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. नवघर येथील तलाव व काशिमीरा येथील जरीमरी तलाव या तलावात म्युझिकल फाउंटन ३० तारखेपासून सुरु होणार असून दररोज रात्री म्युझिकल फाउंटनचे येथे शो येथे होतील , अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी आज दिली. दोन्ही तलावातील या कामांवर सुमारे १६ कोटी खर्च करून हे भव्य - दिव्य आकर्षक काम पूर्ण केले गेले असून मिरा भाईंदर शहर सुशोभीकरण आणि सौंदर्यीकरणाच्या कामात मोठी भर पडली आहे. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील नवघर, गोडदेव, काशिमीरा तलाव हे जुने तलाव असून येथे परिसरातील नागरिक फिरण्यासाठी, निवांत वेळ घालविण्यासाठी सकाळ - संध्याकाळी येत असतात. त्यामुळे या तलावांचे सुशोभीकरण करून त्याठिकाणी संगीत कारंजे (म्युझिकल फाउंटन) बसविण्यासाठी ५० कोटी निधी देण्याची मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून याकामासाठी १०० टक्के निधी राज्य सरकार कडून आमदार सरनाईक यांनी मंजूर करून आणला होता. हा निधी राज्य सरकारने मीरा भाईंदर महापालिकेला दिला होता. त्यातून तिन्ही तलावात सुशोभीकरणाचे काम सुरु करण्यात आले. त्यातील दोन तलावातील कामे पूर्ण झाली आहेत. आमदार सरनाईक यांनी वेळोवेळी सुशोभीकरणाच्या कामाच्या साईटवर जाऊन आढावा घेतला, कामाला गती दिली. गेल्या ८ ते ९ महिन्याच्या कालावधीत हे काम पूर्ण झाले आहे.

### ठाण्याप्रमाणेच मिरा भाईंदरही सुशोभीकरणात पुढे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मिरा भाईंदरला भरभरून विकास निधी दिल्याने ठाण्याप्रमाणेच मीरा भाईंदर शहर खूप विकसित आणि सुशोभित होत आहे. ठाण्याप्रमाणेच मिरा भाईंदरही सुशोभीकरणात पुढे चालले आहे, असे आमदार सरनाईक म्हणाले. ठाण्याच्या उपवन तलावात म्युझिकल फाउंटन लावला गेला आहे. त्याचप्रमाणे आता मिरा भाईंदरच्या दोन तलावात हे म्युझिक फाउंटन लावले गेले आहेत. नवघर तलावात तर म्युझिकल फाउंटनचे काम करताना फायर नोझल पहिल्यांदा लावला गेला आहे. आमदार सरनाईक यांनी राज्य सरकारकडून निधी आणला. त्यांच्या संकल्पनेतून तलाव सुशोभीकरणासोबतच म्युझिकल फाउंटन लावले गेले. शिवाय आमदार सरनाईक यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, जागेवर येऊन वेळोवेळी घेतलेला कामाचा आढावा व दिलेल्या सूचना यामुळे हे काम वेळेत पूर्ण झाले आणि संपूर्ण मिरा भाईंदरकर नागरिकांच्या पसंतीस उतरेल, असे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

### असा आहे नवघरचा म्युझिकल फाउंटन

आमदार प्रताप सरनाईक यांनी माहिती देताना सांगितले की, नवघर येथील तलावाचे सुभोभिकारण करण्यात आले आहे आणि तलावात म्युझिकल फाउंटन बसवला गेला आहे. नवघर तलावाच्या आत असलेल्या म्युझिकल फाउंटन म्हणजेच संगीत कारंजे उडतील त्यावर 'वॉटर स्क्रीन' बनेल. त्यावर ऑडिओ व्हिडीओ कन्टेन्ट म्हणजेच पाच - पाच मिनिटांचे शो दाखवले जातील. आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराज , अयोध्या येथील प्रभू श्री रामाचे मंदिर, मिरा भाईंदरचा इतिहास यावर हे म्युझिकल फाउंटन शो होणार आहेत व त्याची स्क्रिप्ट बनवली जात आहे. शिवाय राज्यात पहिल्यांदाच नवघरच्या तलावात म्युझिकल फाउंटन सोबत 'फायर नोझल' लावला गेला आहे. फायर नोझल म्हणजे म्युझिकल फाउंटन सुरु असताना काही नोझलमधून फायर निघते...वॉटर आणि फायरचा संगम येथे पाहायला मिळेल. शिवाय नवघर तलावाचे सुशोभीकरण करत असताना तलावाच्या परिसरात अम्पी थियेटर बनवले असून तेथे ५०० लोक बसून हा म्युझिकल फाउंटन शो बघू शकतील. लहान मुलांना खेळण्यासाठीची जागा आहे , तलावाला ग्रील लावले आहेत व लॅन्ड स्केपिंग गार्डन केले गेले आहे. नवीन कुंपण भिंत, नागरिकांना चालण्यासाठी पाथ वे, बसायला वेगवेगळे कट्टे बनवले आहेत. नवघरच्या तलावात होणारा म्युझिकल फाउंटनचा शो हा लक्षवेधी, नयनरम्य आणि पाहण्यासारखा असेल, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. दररोज रात्री ७, ८ व ९ वाजता म्युझिकल फाउंटनचे शो होतील व संपूर्ण मिरा भाईंदर मधून लोक ते बघण्यासाठी येतील असेही ते म्हणाले. आकर्षक लाईट इफेक्ट्स विद्युत रोषणाई या म्युझिकल फाउंटच्या वेळी पाहायला मिळेल आणि लोक हे पाहताना आनंद व्यक्त करतील.

### काशिमीरा जरीमरी तलावातही म्युझिकल फाउंटन

काशिमीरा येथील जरीमरी तलाव येथेही म्युझिकल फाउंटन बसवला गेला आहे. संगीतावर नाचणारे कारंजे येथे दिसतील. विशेष म्हणजे या संगीत कारंज्याची रंगसंगती दिवसाप्रमाणे व दिन विशेषांप्रमाणे बदलू शकणार आहे, अशी त्यात व्यवस्था केली गेली आहे. स्वातंत्र्य दिन, दिवाळी, श्री गणेशोत्सव असे जे जे महत्वाचे दिवस असतील त्या दिवशी त्या म्युझिकल फाउंटनचे रंग बदलतील आणि त्या रंगातील व त्या म्युझिकवर म्युझिकल फाउंटन बघायला मिळतील. देशभक्ती, भक्ती संगीत किंवा प्रत्येक दिवसाप्रमाणे म्युझिकल फाउंटन सुरु राहणार आहे, अशी माहिती आमदार सरनाईक यांनी दिली. मिरा भाईंदरच्या दोन मोठ्या तलावांचे रूप पूर्णपणे या कामामुळे पालटले गेले असून परिसराच्या व शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. हे तलाव सुशोभीकरण करीत असताना तलावाचे पाणी कायम शुद्ध राहील याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.



### ठाणे रेल्वेस्थानक परिसरातील

## फेरीवाल्यांवर पालिकेची कारवाई

ठाणे : ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई सुरु आहे, सोमवारी ठाणे रेल्वेस्थानकाच्या१५० मीटर परिसरातील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. सॅटिस पुलाखालील फेरीवाले, आलोक हॉटेल ते तीन हात नाका (गोखले रोड), राम मारुती रोड, गांवदेवी भाजी मार्केट बाहेरील फेरीवाले, जांभळी नाका, तलावपाळी तसेच कपडा मार्केट परिसरात अनधिकृतपणे व्यवयाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली.

या कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेली फळे, भाजीपाला व इतर साहित्य सेवाभावी संस्था यांना देण्यात आले असून सदरचा परिसर फेरीवाला मुक्त करण्यात आला असून सर्व फूटपाथ नागरिकांकरिता मोकळे करुन देण्यात आले.

नौपाडा कोपरी प्रभाग समितीमधून अनधिकृत फेरीवाल्यांबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत होत्या. सदरची कारवाई उपायुक्त शंकर पाटोळे आणि सहाय्यक आयुक्त सोपान भाईक यांच्या उपस्थितीत अतिक्रमण विभागामार्फत करण्यात आली.

### संदीप नाईक यांची मागणी

## प्रकल्पग्रस्तांची बांधकामे जमिनीच्या मालकी हक्कासह नियमित करून शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी

नवी मुंबई : प्रकल्पग्रस्तांची, गरजवंतांची बांधकामे जमिनीच्या मालकी हक्कासह (फ्री होल्ड) नियमित करून शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केली आहे.अशा मागणीचे पत्र लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सिडको अध्यक्ष, नगर विकास सचिव, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना पाठवले आहे.

गरजेपोटीची निवासी आणि उपजीविकेसाठी करण्यात आलेली प्रकल्पग्रस्तांची बांधकामे नियमित करण्याच्या शासन निर्णयावर प्रतिक्रिया देताना संदीप नाईक म्हणाले, प्रकल्पग्रस्तांची मूळ गावठाण आणि विस्तारित गावठाण क्षेत्रातील बांधकामे नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांचे आम्ही अभिनंदन करतो. वास्तविक जमिनीच्या मालकी हक्कासह बांधकामे नियमित व्हायला पाहिजेत. जमिनी फ्री होल्ड व्हायला पाहिजेत. यासाठी लोकनेते आमदार गणेश नाईक सातत्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शासन, नगर विकास खाते, सिडको आणि संबंधित प्राधिकरणांकडे पाठपुरावा करीत आहेत. विधानसभेच्या अधिवेशनांमधून त्यांनी लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, औचित्याचा मुद्दा, अर्धा तास चर्चा या माध्यमातून आवाज उठवला आहे. बैठका घेतलेल्या आहेत. अखेर गरजेपोटीची बांधकामे नियमित करण्याचा जीआर शासनातर्फे काढण्यात आला. प्रकल्पग्रस्तांना जमिनीची मालकी द्यावी ही प्रमुख



मागणी होती. २२ सप्टेंबर २०२४ रोजी ऐरोली येथे कोळी भवनाच्या भूमिपूजन समारंभप्रसंगी उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याजवळ पुन्हा एकदा लोकनेते आमदार नाईक यांनी जमिनीच्या मालकी हक्कासह बांधकामे नियमित करण्याची मागणी केली.

यावेळी केलेल्या भाषणामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी मालकी हक्काने प्रकल्पग्रस्तांची बांधकामे नियमित करण्यात येतील, असे जाहीर केले आहे. परंतु निघालेल्या जीआरमध्ये जमिनीचा भाडेपट्टा होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरी हा भाडेपट्टा न करता जमिनीची मालकी प्रकल्पग्रस्तांना द्यावी. त्या अनुषंगाने जीआरची अंमलबजावणी करावी. प्रकल्पग्रस्तांची बांधकामे नियमित करताना ० ते २५० चौरस मीटर पर्यंत १५ टक्के आणि २५१ ते ५०० चौरस मीटर पर्यंत २५ टक्के आणि ५०१ चौरस मीटर पेक्षा अधिक जमीनक्षेत्राला ३०० टक्के दर आकारण्यात येणार आहे. परंतु एखाद्याचे शेत मूळ गावठाणापासून जवळ असेल त्यांनी तेथे घरे बांधली. एखाद्याचे शेत ५०० चौरस मीटर अंतरावर किंवा त्यापेक्षा अधिक अंतरावर असेल त्याने तेथे घर बांधले असेल. त्यामुळे दरामध्ये दुजाभाव न ठेवता सर्वांना एकसमान १५ टक्के दर आकारण्यात यावा.

बांधकामे नियमितीकरणासाठी पैसे भरण्याकरता प्रकल्पग्रस्तांना पुरेशी आणि योग्य मुदत देण्यात यावी. प्रकल्पग्रस्तांना बांधकामे विकसित करायची असल्यास त्यांना चांगल्या परिस्थितीमध्ये ती विकसित करता आली पाहिजेत. सर्व घटकांना सामावून घ्यावे, एकही घटक वंचित राहता कामा नये. शासन निर्णयाची अंमलबजावणी कालबद्ध पद्धतीने योग्यरीत्या व्हायला पाहिजे. शासन निर्णयामध्ये या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची विनंती पत्रामध्ये मुख्यमंत्री महोदयांना करण्यात आलेली आहे.

## 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेंतर्गत चारही प्रभागांमध्ये स्वच्छताकर्मींच्या आरोग्य शिबीराचे आयोजन

पनवेल : स्वच्छ भारत अभियानाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय आणि केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात येत आहे. स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहीमेस महापालिका कार्यक्षेत्रात चारही प्रभागात उत्साहात सुरूवात झाली आहे. या अंतर्गत चारही प्रभागातील घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व सफाई कर्मचारी तसेच त्यांच्या कुटूंबियांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने आदरांजली म्हणून 'स्वच्छ भारत दिवस' साजरा केला जातो. स्वच्छ भारतासाठी स्वयं प्रेरणा व सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा साजरा आयोजित करण्यात आला आहे. या पंधरावड्यांतर्गत



सखोल स्वच्छता मोहिमांबरोबरच 'सफाई मित्र सुरक्षा शिबीर' उपक्रम राबविला जात आहे. याअंतर्गत महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व सफाई कर्मचारी तसेच त्यांच्या कुटूंबियांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन २३,२४,२५ सप्टेंबर रोजी प्रभाग निहाय नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आयोजित करण्यात आले आहे.

या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये कर्मचाऱ्यांच्या जनरल तपासणी, धनुर्वाताचे इंजेक्शन, आवश्यकतेनूसार रक्त चाचण्या, इतर चाचण्या करण्यात येत आहेत. तसेच आवश्यकतेनूसार तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे. या आरोग्य तपासणीमध्ये केवळ महापालिका कर्मचारीच नाही तर त्यांच्या कुटूंबियांची देखील आरोग्य तपासणी केली जात आहे.

'स्वच्छता हीच सेवा' या मोहिमेंतर्गत १७ सप्टेंबर पासून दिनांक २ ऑक्टोबर या कालावधीत पालिका क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी स्वच्छता ही आपली जीवनपध्दती बनविण्यासाठी प्रतिज्ञा करून स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन घनकचरा व आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.

बॉयलर इंडिया- २०२४

## नवीमुंबईत तीन दिवस प्रदर्शन : संचालक धवल अंतापूरकर

नवी मुंबई : उद्योग आणि शासन या त्रिसूत्रीचे सांगड घालून बाष्पके उद्योगाला चालना देण्यासोबतच बाष्पकांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर कसा करता येईल या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाअंतर्गत असलेल्या बाष्पके संचालनालयाच्या वतीने दि. २५, २६ आणि २७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवीमुंबई या ठिकाणी जागतिकस्तरावरील बॉयरल इंडिया २०२४ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती बाष्पके संचालनालयाचे संचालक धवल अंतापूरकर यांनी दिली आहे. बॉयरल इंडिया २०२४ या प्रदर्शनाचे उदघाटन सकाळी १०.३० वाजता राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्याहस्ते सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवीमुंबई या ठिकाणी होणार असून, या कार्यक्रमास राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच शासकीय अधिकारी आणि उद्योजक उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनामध्ये बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सॉफ्टवेअर या प्रणालीचे लोकार्पण होणार आहे. इचचड प्रणालीमुळे बाष्पके उद्योगांमध्ये बाष्पक व त्याच्या सुट्या भागाच्या निर्मितीची प्रक्रिया जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम होणार आहे. BMMS सॉफ्टवेअरच्या मदतीने आता उत्पादनातील प्रत्येक टप्प्याचे संपूर्ण दस्तऐवजीकरण एका प्लॅटफॉर्मवर सहजपणे करण्यात येईल, ज्यामुळे उत्पादक आणि नियामक यांच्यातील समन्वय अधिक चांगला होईल.

## पाणी बिलाची थकबाकी ठेवणाऱ्यांवर पालिकेची कारवाई

**महापालिका क्षेत्रात ६११ नळ जोडण्या केल्या खंडित, ३० मोटर पंप जप्त**

**सुमारे ३३ कोटी रुपयांची पाणी बिल वसुली**



ठाणे : ठाणे महापालिकेची पाणी बिल थकबाकी वसुलीकरता पाणी पुरवठा विभागाने कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेत संपूर्ण महापालिका क्षेत्रात आतापर्यंत ६११ नळ जोडण्या खंडित केल्या असून ३० मोटर पंप जप्त केले आहेत. या पाणी बिल वसुली अभियानात आतापर्यंत सुमारे ३३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. दरम्यान, पाणी बिलाची रक्कम वेळच्या वेळी भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेची पाणी बिल रक्कम सुमारे २२४ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची बिल रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

| प्रभाग | कारवाई | वसुली |
|---|---|---|
| नौपाडा - कोपरी : | १५ | ४,५४,२७,३२५ |
| उथळसर : | ५८ | ३,४७,३२,४९७ |
| माजिवडा मानपाडा : | ०० | ६,२१,७५,४५९ |
| वर्तकनगर : | ३५ | २,९४,२३,७१० |
| कळवा : | ०० | २,४८,५४,२२८ |
| वागळे : | २४९ | १,६९,७७,६५४ |
| लोकमान्य- सावरकर : | ३७ | ३,००,१५,७४२ |
| मुंब्रा : | १०५ | ३,८२,७२,४६३ |
| दिवा : | ११२ | २,८६,९६,९९८ |
| मुख्यालय-सीएफसी | ०० | २,७६,६०,५५३ |
| **एकूण :** | **६११** | **३३,८२,३६,६२९** |

त्या पार्श्वभूमीवर, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी बिलाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी बिल वसुली अभियान सुरू करण्यास सांगितले होते. त्यानुसार, पाणी बिलाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी बिलाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

### थकीत बिलावरील प्रशासकीय आकारात सूट

महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळ संयोजनाच्या थकीत देयकाची चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यास महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मान्यता दिली आहे. थकीत पाणीपट्टी बिलावरील दंडात १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहीर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

ही योजना ०१ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

## राष्ट्रीय 'पोषण माह' राबविण्यात देशात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक : आयुक्त (अंगणवाडी) कैलास पगारे

नवी मुंबई : महिला व बालकांच्या आहारासंदर्भात असलेले गैरसमज दूर व्हावे, महिलांनी बालकांच्या पोषणासाठी काय काळजी घेतली पाहिजे. या सबंधित माहिती जनसामान्यपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागामार्फत दिनांक ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत विविध उपक्रम राबवून पोषण माह साजरा करण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आतापर्यत अंगणवाडयांमार्फत १ कोटी ६८ लाख १५ हजार १९५ उपक्रमे राबविण्यात आली असून, हा ७ वा राष्ट्रीय पोषण माह राबविण्यात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक असल्याची माहिती एकात्मिक बाल विकास योजनेचे आयुक्त(अंगणवाडी) कैलास पगारे (भा.प्र.से.) यांनी दिली.

रायगड भवन येथील महिला व बाल विकास विभागाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

केंद्र शासनाच्या 'सुपोषित भारत' संकल्पनेनुसार एक महत्वपूर्ण कार्यक्रम म्हणून राष्ट्रीय पातळीवर पोषण अभियान कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत महिला व बालकांचे आरोग्य व पोषण या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने व 'सुपोषित भारत' ही संकल्पना साकारण्याच्या दुष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील ग्रामीण, आदिवासी व नागरी क्षेत्रातील एकूण ५५३ बालविकास प्रकल्पातील १ लाख १० हजार ५१६ अंगणवाडी केंद्रांमध्ये करण्यात आली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील २९ लाख ३६ हजार ९२४ बालके, ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील २४ लाख ६२ हजार ६९० बालके तर ४ लाख ९४ हजार ०७४ गरोदर महिला आणि ४ लाख ९६ हजार ८५२ स्तनदा माता तसेच गडचिरोली, नंदूरबार, धाराशीव आणि वाशिम या चार आकांक्षित जिल्हयातील १ लाख १२ हजार ३९५ किशोरवयीन मुली या योजनेचा लाभ घेत आहेत.

महिला व बाल विकास विभागाच्या केंद्रीय मंत्री श्रीमती. अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी ७ वा राष्ट्रीय पोषण माह या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता. माहे सप्टेंबर २०२४ मध्ये संपूर्ण राज्यभर साजरा होत असलेल्या ७ वा राष्ट्रीय पोषण माहमध्ये केंद्र शासनाने १.नेमिया २. ग्रोथ मॉनेटरींग ३. वरचा आहार ४. पोषण भी पढाई भी ५.उत्तम प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा वापर या पाच संकल्पना निश्चित करुन दिल्या आहेत.

राज्यात आतापर्यंत अंगणवाडी स्तरावर एकूण १ कोटी ६८ लाख १५ हजार १९५ इतकी उपक्रमे राबविण्यात आली आहेत. यामध्ये 'एक पेड माँ के नाम' अभियान, 'चिमुकल्यांची वसुंधरा' अभियान, 'नेमिया', 'बाळाचे पाहिले हजार दिवस', 'बाळांचे वृध्दी सनियंत्रण', 'डायरिया प्रतिबंध' आणि 'पोषण भी पढाई भी' अशा विविध विषयांवर वेबिनाराचे आयोजन अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांची नोंद केंद्रशासनाच्या जनआंदोलन डॅशबोर्डवर घेण्यात आली आहे. त्यानुसार राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र राज्य हे प्रथम क्रमांकावर आहे, अशी माहिती आयुक्त (अंगणवाडी) पगारे यांनी यावेळी दिली.

जिल्हा प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षक, जिल्हा कार्यक्रम अधिकारी हे उत्तम कार्य करीत आहेत. त्याच बरोबर या कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी व प्रचार झाल्यास पोषण आहाराचे महत्व जनसामान्यांपर्यंत पोहचेल. खऱ्या अर्थाने 'पोषण माह' साजरा करण्यासाठी आणि समाजातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी या कार्यक्रमाची माहिती समाजातील प्रत्येक घटकांपर्यत पोहचणे आवश्यक आहे. असे आवाहन एकात्मिक बाल विकास योजनेचे आयुक्त (अंगणवाडी) कैलास पगारे (भा.प्र.से.) यांनी केले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771